


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ३५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१८ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी!



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे लक्ष लागून राहिलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये या परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार आहे. सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर होणार असून या तारखांमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी नियोजन करता येणार आहे.

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. इयत्ता बारावीच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एचएससी) आणि दहावीच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षांचे वेळापत्रक मंडळाने जाहीर केले आहे.

**अभ्यासाचे नियोजन करता येणार**

बारावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा सोमवार, ८ फेब्रुवारी २०२७ पासून सुरू होणार असून, मंगळवार, १६ मार्चपर्यंत चालणार आहे. तर दहावीच्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा सोमवार, १५ फेब्रुवारीपासून सुरू होऊन गुरुवार, ११ मार्च रोजी संपणार आहे. दोन्ही परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांसह शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे आणि उजळणीचे नियोजन करता येणार आहे.

**प्रात्यक्षिक परीक्षांच्या तारखा**

लेखी परीक्षांपूर्वी बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा बुधवार, २० जानेवारी ते शनिवार, ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा गुरुवार, २८ जानेवारी ते शनिवार, १३ फ ेब्रुवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करता यावे, तसेच परीक्षेच्या काळात त्यांच्यावरील ताण कमी व्हावा, या दृष्टीने मंडळाने परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक संबंधित विभागीय मंडळांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत वेळापत्रक तपासून त्यानुसार परीक्षेची तयारी करावी, असे आवाहन मंडळाने केले आहे.

## लाडकी बहीण योजनेवरून, उद्धव ठाकरेंचा महायुतीवर निशाणा !



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, छत्रपती संभाजीनगर :** एकीकडे 'मुख्यमंत्री म ाझी लाडकी बहीण' योजनेचा मोठा डांगोरा पिटायचा आणि दुसऱ्या बाजूला गॅस, डाळी अन् खाद्यतेलाचे भाव वाढवून त्याच बहिणींच्या खिशावर दरोडा टाकायचा, अशा तीव्र शब्दांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारवर घणाघाती हल्ला चढवला. छत्रपती संभाजीनगरात आयोजित पत्रकार परिषद आणि म हामोर्चाच्या व्यासपीठावरून बोलताना त्यांनी लाडकी बहीण योजनेतील भ्रष्टाचार, अमानुष महागाई आणि राज्यातील इतर ज्वलंत प्रश्नांवरून सरकारला चांगलेच धारेवर धरले.

लाडकी बहीण योजनेच्या आडून सुरू असलेल्या राजकीय स्टंटबाजीवर प्रहार करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, सरकार एका हातात १५०० रुपये देऊन लाडक्या बहिणींना खूश करत असल्याचा आव आणत आहे, पण दुसऱ्या बाजूला महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. महागाईचा फटका काय फक्त विरोधी पक्षातील महिलांनाच बसतोय? सरकारच्या पाठीशी उभ्या असणाऱ्या समर्थकांच्या घरातील लाडक्या बहिणींना महागाई सहन करावी लागत नाही का? असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला.

**दिशा सालियन प्रकरणी कायदेशीर कारवाईचा इशारा**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणात आमचा किंवा आमच्या कुटुंबाचा दूरान्वयेही संबंध नाही, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी विरोधकांना इशारा दिला. केवळ राजकीय सूडबुद्धीने आमचे फालतू चारित्र्यहनन केले जात आहे. ज्या व्यक्तीशी आमची साधी ओळखही नव्हती, तिच्याशी आमचा काय संबंध? हे फालतू चारित्र्यहनन आता बस झाले, अन्यथा आम्ही कठोर कायदेशीर मार्गाने जाऊ, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

**गोपीनाथ मुंडेंच्या अपघाताबाबत संशय**

पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अपघाताचा मुद्दा उपस्थित केला. ज्याप्रमाणे अजित पवारांच्या अपघाताबाबत राजकीय वर्तुळात शंका उपस्थित होत आहेत, तसाच संशय लोकनेते गोपीनाथराव म ुंडे यांच्या अपघाताबाबतही आहे. मी कोणावरही थेट आरोप करत नाहीये, पण महाराष्ट्रात भाजप रोवणाऱ्या मुंडेंच्या अपघाती मृत्यूचे रहस्य अद्याप उलगडलेले नाही, त्यामुळे त्याची सखोल चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

## पारनेर कारखाना विक्री घोटाळ्यात पुण्याच्या चोरडिया बंधूंची चौकशी!

### काळा पैसा पांढरा केल्याचा कारखाना बचाव समितीचा दावा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्री घोटाळ्यातील गुन्ह्यातील नऊ आरोपींच्या बँक खात्यांवर सुमारे तेवीस कोटी रुपये पाठवणारे पुण्याचे अतुल चोरडीया व अशोक चोरडिया या बड्या उद्योजक बंधूंची पारनेर पोलिसांकडून चौकशी होणार आहे. पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि तपासी अधिकारी सोमनाथ दिवटे यांनी चोरडीया बंधुंना तपासाकामी पारनेर पोलीस ठाण्यात उपस्थित राहण्याच्या नोटीस बजावल्या आहेत.

जुन महीण्यात या गुन्ह्याचा तपास पारनेर न्यायालयाच्या निगराणीत गेल्याचा आदेश झाल्यानंतर थंडावलेल्या तपासाने पुन्हा एकदा गती घेतली आहे.

याबाबत सविस्तर हकीगत अशी की,पारनेर साखर कारखाना राज्य सहकारी बॅंकेकडून लिलावात खरेदी करीता चोरडिया बंधूंनी पुण्याचे माजी खासदार विदुरा नवले यांच्या कुटुंबातील सदस्य नऊ आरोपींच्या खात्यात सुमारे तेवीस कोटी रुपये रकमा पाठवल्या आहेत, या रकमा आरोपींनी त्यांच्या क्रांती शुगर कंपनीत न गुंतवता थेट महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेला परस्पर पाठवल्या होत्या व त्या बदल्यात क्रांती शुगर कंपनी करिता साखर कारखान्याची मालमत्ता खरेदी केली होती. केवळ कागदोपत्री अस्तित्व असलेल्या क्रांती शुगर कंपनीने कोट्यावधी रुपयांच्या रकमेचा पारनेर सहकारी साखर कारखाना कसा खरेदी केला याबाबत आक्षेप घेऊन कारखाना बचाव समितीने गुन्हा दाखल केला आहे.

कारखाना बचाव समितीचा आरोप आहे की, चोरडिया बंधुंनी गुंतवलेला हा सर्व कर चुकवलेला पैसा (काळा पैसा ) असून, आरोपींनी त्यातून म ालमत्ता खरेदी

केल्याचे दाखवून पुन्हा त्याच मालमत्तेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने आरोपींना सुमारे ३४० कोटी रुपयांचे कर्ज काढले आहे. अशाप्रकारे आरोपींनी काळा पैसा पांढरा केला आहे.

त्यासाठी आरोपींना या प्रकरणात आर्थिक रसद पुरवठा करणाऱ्या चोरडीया बंधूंची सखोल चौकशीची मागणीची मागणी कारखाना बचाव समितीने पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

## वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार ; सावली वनपरिक्षेत्रातील घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, सावली (चंद्रपूर) :** सावली वनपरिक्षेत्राअंतर्गत व्याहाड खुर्द उपवनपरिक्षेत्रातील कक्ष क्रमांक १५१२ मध्ये वाघाने केलेल्या हल्ल्यात गुराखी ठार झाला. ही घटना बुधवार, १६ सप्टेंबर रोजी दुपारी घडली. वासुदेव वाकुडकर (वय ६० रा. निलसनी पेठगाव) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

वासुदेव वाकुडकर हे आपल्या साथीदार गुराख्यासह नेहमीप्रमाणे गुरे राखण्यासाठी शेतशिवारात असलेल्या जंगल क्षेत्रात गेले होते. यावेळी वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. हल्ल्यात ते गंभीर झाले उपचार मिळण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वनविभाग आणि पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या घटनेनंतर परिसरातील नागरिक, शेतकरी व गुराख्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निलसनी पेडगाव व परिसरातील जंगल भागात वाघाच्या हल्ल्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या तीन वर्षात या परिसरात वाघाच्या हल्ल्यात तीन जणांचा बळी गेल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे वनविभागाने वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## माथेरानच्या ई रिक्षा चालकांना नेरळच्या सर्विस सेंटर चा फटका

### खराब अंतर्गत रस्त्यांमुळे बिघाड वाढले, नागरिक-पर्यटकांनाही वाहतुकीचा त्रास



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१७, माथेरान :** माथेरानमध्ये ई-रिक्षांची संख्या मर्यादित असताना त्यांच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी स्थानिक पातळीवर अधिकृत सर्व्हिस सेंटर उपलब्ध नसल्याने रिक्षाचालकांना नेरळ येथे जावे लागते. त्यातच माथेरानचे अंतर्गत व माध्यमिक रस्ते अनेक ठिकाणी खराब असल्याने रिक्षांच्या विविध भागांमध्ये वारंवार बिघाड होत असल्याच्या तक्रारी रिक्षाचालकांकडून होत आहेत. त्यामुळे दुरुस्तीसाठी प्रत्येक वेळी नेरळ गाठावे लागत असल्याने त्यांचा वेळ आणि व्यवसायाचेही नुकसान होत आहे.

गुरुवारी गणेशोत्सवाच्या काळात माथेरानच्या २०पैकी तब्बल ९ ई-रिक्षा दुरुस्तीसाठी नेरळ येथील महिंद्रा सर्व्हिस सेंटरमध्ये नेण्यात आल्या होत्या. सकाळी ११ वाजता पोहोचल्यानंतर निलेश म्हात्रे हे एकमेव कर्मचारी रिक्षांची दुरुस्ती पाहत होते. मात्र काही वेळाने ते कोणतीही सूचना न देता निघून गेले. सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ते परत न आल्याने रिक्षाचालकांना दिवसभर प्रतीक्षा करावी लागली. संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळाला नसल्याचे रिक्षाचालकांनी सांगितले. अखेर रिक्षा सर्व्हिस सेंटरमध्येच ठेवून त्यांना माथेरानला परतावे लागले.

सकाळी ११ वाजता रिक्षा घेऊन सर्व्हिस सेंटरम ध्ये गेलो. निलेश म्हात्रे हे एकटेच दुरुस्तीचे काम करत होते. मात्र ते अचानक निघून गेल्यानंतर पुन्हा आले नाहीत. त्यामुळे सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत वाट पाहून रिक्षा तिथेच ठेवून माथेरानला परतलो. त्यामुळे आजच्या व्यवसायाचे नुकसान झाले, अशी प्रतिक्रिया रिक्षाचालक रोहित बल्लाळ (रिक्षा क्र. ७) यांनी दिली. गणेशोत्सवाच्या काळात पर्यटकांची गर्दी असताना नऊ रिक्षा दुरुस्तीसाठी बाहेर गेल्याने माथेरानमधील उपलब्ध रिक्षांची संख्या कमी झाली. त्यामुळे नागरिक आणि पर्यटकांना रिक्षासाठी प्रतीक्षा करावी लागली. रस्त्यांची खराब अवस्था आणि त्यातून होणारे वारंवार रिक्षांचे बिघाड यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत असल्याचे रिक्षाचालकांचे म्हणणे आहे.

सर्व्हिस सेंटरमध्ये कर्मचारी उपलब्ध नसणार असल्यास पूर्वसूचना देणे किंवा अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच माथेरानच्या ई-रिक्षांसाठी स्थानिक पातळीवर सर्व्हिसिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही होत आहे.

दरम्यान, भविष्यात ई-रिक्षांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेताना माथेरानचे खराब अंतर्गत रस्ते, त्यातून होणारे वारंवार बिघाड, सर्व्हिसिंगची अडचण आणि पर्यटकांची वाढती वाहतूक या सर्व बाबींचा नियंत्रण समितीने विचार करणे आवश्यक आहे. काही रिक्षा दुरुस्तीसाठी बाहेर गेल्या तरी नागरिक व पर्यटकांच्या वाहतुकीसाठी पुरेशा रिक्षा उपलब्ध राहतील, अशा दृष्टीने ई-रिक्षांची संख्या वाढविण्याची मागणी रिक्षाचालकांकडून होत आहे.

## वीजपुरवठा सुरळीत करा, अन्यथा महावितरणला टाळे ठोकू



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** गणेशोत्सवाच्या धामधुमीतच ग्रामीण भागातील सायंकाळच्या अघोषित वीज भारनियमनामुळे नागरिक, शेतकरी आणि गणेशभक्तांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या समस्येविरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने गुरुवारी (दि. १७) लासलगाव येथील महावितरण कार्यालयावर धडक मोर्चा काढत उपकार्यकारी अभियंत्यांना घेराव घालण्यात आला. वीजपुरवठा तातडीने सुरळीत न झाल्यास कार्यालयाला टाळे ठोकू, तसेच महावितरणच्या एकाही अधिकाऱ्याला ग्रामीण भागात फिरू देणार नाही, असा संतप्त इशारा यावेळी आंदोलकांनी दिला.

सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सवात दररोज संध्याकाळीच वीजपुरवठा खंडित होत असल्याने आरती आणि पूजेच्या वेळी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्यातच निफाड परिसरातील गावांमध्ये बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असल्याने सायंकाळच्या वेळी वीज नसणे ग्रामस्थांच्या आणि लहान मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकेदायक ठरत आहे.

या गंभीर प्रश्नावर जाब विचारण्यासाठी तालुक्यातील तब्बल ४६ गावांमधून शेकडो शिवसैनिक, शेतकरी आणि गणेशभक्त लासलगाव महावितरण कार्यालयात जमा झाले. संतप्त आंदोलकांनी कार्यालयात ठिय्या मांडत अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

या आंदोलनात माजी पंचायत समिती सभापती शिवा पाटील सुरासे, उपजिल्हाप्रमुख निवृत्ती जगताप, उत्तमराव वाघ, डॉ. श्रीकांत आवारे, गणेश डोम ाडे, बद्रीनाथ लोहारकर, ज्ञानेश्वर तासकर, आत्माराम दरेकर, संतोष पानगव्हाणे, शंकरराव शिंदे, सतीश गांगुर्डे, दिलीप गांगुर्डे, बाबुराव गांगुर्डे, बापूसाहेब डुबरे, रामनाथ सुराशे, रवींद्र पाचोरकर, वसंत खुर्दे, सचिन पवार, रेवन्नाथ शिंदे, शरद शिंदे, रामदास काळे, सोमनाथ केंदळे, तुळशीराम सुराशे, बाजीराव जाधव, संजय जाधव, बापूसाहेब भोसले, प्रवीण नाईक, जितेंद्र जाधव, नाना खुर्दे, शिवाजी खुर्दे, पंढरीनाथ साप्ते यांच्यासह ४६ गावांतील शिवसैनिक, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्षराज






# विखुरलेल्या जगाशी नाते

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुत्सद्देगिरीची एक वैशिष्ट्यपूर्ण शैली विकसित केली आहे. ती एकाच वेळी वैयक्तिक, उत्साही, व्यावहारिक आणि विरोधाभास सहजपणे हाताळणारी आहे. ते पुतिन यांच्याशी निकटचे संबंध ठेवू शकतात, शी जिनपिंग यांच्याशी संवाद साधू शकतात, अमेरिकेशी व्यवहार करू शकतात, युरोपला आकर्षित करू शकतात, आखाती देशांशी संबंध अधिक दृढ करू शकतात आणि तरीही स्वतःला 'ग्लोबल साउथ'चा बुलंद आवाज म्हणून स्थापित करू शकतात. त्यांचा देशांमधील संबंधांवर विश्वास आहे आणि तेवढाच नेत्यांमधील वैयक्तिक संबंधांवरही आहे. ते लोकांची नावे लक्षात ठेवतात, हावभावांचे महत्त्व ओळखतात, प्रतीकांचा प्रभावी वापर करतात. कपभर चहाच्या संवादातून जे साध्य होते, ते अनेकदा काळजीपूर्वक तयार केलेल्या राजनैतिक दस्तऐवजातूनही साध्य होत नाही, हे त्यांना ठाऊक आहे.

नवी दिल्लीत नुकत्याच झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत या शैलीची अनेक वैशिष्ट्ये एकाच वेळी पाहायला मिळाली. ब्रिक्स सदस्य देशांच्या राजकीय पद्धती, सामरिक हितसंबंध आणि जागतिक दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. पश्चिम आशियापासून चीन आणि रशियापर्यंत अनेक तणावपूर्ण समीकरणे या गटात आहेत. तरीही प्रत्येक सदस्य देशाने नवी दिल्ली जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली. मोदी यांनी स्वतः तीन दिवसांत विविध नेत्यांसोबत १५ द्विपक्षीय बैठका घेतल्या. प्रत्येक देशाचे हितसंबंध वेगळे असतानाही त्यांनी भारताचे हित ठामपणे केंद्रस्थानी ठेवले.

मोदींच्या कार्यपद्धतीत आपुलकी आणि दृढनिश्चय यांचे अनोखे मिश्रण आहे. त्यांची आलिंगने, हस्तांदोलन आणि छायाचित्रे लक्ष वेधून घेतात; पण त्यामागे परराष्ट्र धोरणाचा शिस्तबद्ध दृष्टिकोन दडलेला असतो. मोदींना मुत्सद्देगिरीबद्दल एक साधी गोष्ट समजली आहे : सरकारांमध्ये मतभेद झाले, तरी नेत्यांनी थेट संवाद साधणे उपयुक्त ठरते. अमेरिकेच्या विविध राष्ट्राध्यक्षांशी त्यांचे संबंध, पुतिन यांच्याशी सातत्यपूर्ण संवाद, शी जिनपिंग यांच्याशी चर्चा आणि युरोप, आफ्रिका व आखाती देशांतील नेत्यांशी साधलेला संपर्क, हा याच रणनीतीचा भाग आहे.

भारतीय पंतप्रधानांनी क्वचितच भेट दिली असेल अशा ठिकाणी जाण्याचीही त्यांची तयारी असते. २०२५ मध्ये त्यांनी तीन दशकांनंतर घानाला आणि २६ वर्षांनंतर त्रिनिदाद आणि टोबॅगोला द्विपक्षीय भेट दिली. अशा भेटींमुळे सद्भावना निर्माण होते आणि मोठ्या देशांकडून सहसा कमी लक्ष दिल्या जाणाऱ्या देशांशी भारताचे संबंध दृढ होतात.

ही वैयक्तिक कार्यशैली धोरणात्मक स्वायत्ततेच्या त्यांच्या व्यापक विचाराशी सुसंगत आहे. मोदींच्या मते भारताने केवळ दुसऱ्यांनी तयार केलेले नियम पाळणारा देश न राहता नियम घडवणारा देश व्हायला हवे. भारताने बचावात्मक भूमिकेऐवजी आत्मविश्वासाने जगाला सामोरे जावे, असे त्यांना वाटते. याचा अर्थ 'क्वाड'च्या माध्यमातून अमेरिकेबरोबर काम करणे, रशियासोबत दीर्घकालीन संबंध टिकवणे, 'ब्रिक्स'च्या माध्यमातून चीनशी संवाद ठेवणे, युरोप आणि आखाती देशांशी भागीदारी अधिक मजबूत करणे आणि ग्लोबल साउथच्या व्यासपीठांवरून विकसनशील अर्थव्यवस्थांचे समर्थन करणे असा आहे.

कोणत्याही एका गटाशी आपोआप जुळवून घेण्याऐवजी भारताच्या हिताच्या आधारावर प्रत्येक मुद्द्यावर भूमिका घेणे हा मोदींचा दृष्टिकोन राहिला आहे. म्हणूनच मोदी यांच्या नेतृत्वाखाली धोरणात्मक स्वायत्तता अधिक सक्रिय आणि ठाम झाली आहे. एका देशाबरोबर संरक्षण, दुसऱ्यासोबत ऊर्जा आणि तिसऱ्यासोबत तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्य करतानाच इतर मुद्द्यांवर असहमती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य भारताने राखले आहे.

आघाडी स्थापन करण्याची त्यांची क्षमता २०२३ मधील भारताच्या जी-२० अध्यक्षपदाच्या काळात प्रकर्षाने दिसून आली. युक्रेन युद्धामुळे रशिया आणि पाश्चात्त्य देशांतील संबंध अधिक तणावपूर्ण झाले होते आणि सर्वसहमती होण्याची शक्यता धूसर होती. मात्र, भारताने सातत्याने सर्व पक्षांना चर्चेत सहभागी ठेवले आणि ज्या मुद्द्यांवर सहमती शक्य होती, त्यावर भर दिला. अखेरीस भारताला 'नवी दिल्ली नेत्यांचा जाहीरनामा' मंजूर करून घेण्यात यश आले.

**– श्याम ठाणेदार**

# सार्वजनिक जीवनात नैतिकता आणि सभ्यता पाळा!

प्रत्येकाला वैयक्तिक आणि सार्वजनिक आयुष्य लाभलेले असते. वैयक्तिक आयुष्यात आपण मोकळेपणाने जगत असतो. परंतु सार्वजनिक आयुष्यात जगत असताना अनेक गोष्टींच्या मर्यादा आलेल्या असतात. इतरांना आपला त्रास होणार नाही, अशा पद्धतीने वर्तन करण्याचा प्रयत्न आपण करत गेलो, तरच आपले सार्वजनिक आयुष्य सभ्य आणि नैतिक आहे, असे म्हणता येते.

सार्वजनिक ठिकाणे ही सर्वांच्या मालकीची असतात. अशा ठिकाणी लोक बेफिकीरपणे वागताना आपल्याला सर्रास दिसतात. साध्या एखाद्या चहाच्या कॅन्टीनबाहेर आपण मित्रांसोबत चहा घेण्यासाठी गेलो, तर तेथील सार्वजनिक ठिकाणी काही जण सिगारेट ओढताना दिसतात. त्यांच्या या सिगारेट ओढण्यामुळे तेथे उभ्या असलेल्या इतरांना पॅसिव्ह स्मोकिंगमुळे त्रास होत असतो.अशा प्रकारे अनेक सार्वजनिक ठिकाणी लोक बहुसंख्यांकाच्या जोरावर आणि इतरांकडून विरोध होत नसल्याच्या सबबीखाली सार्वजनिक शांतता, सभ्यता आणि कायदा-सुव्यवस्था धाब्यावर बसवत असतात. त्यांचे हे वर्तन म्हणजे एक प्रकारचे दमनतंत्रच होय.

हजारो वर्षांपूर्वी माणसांमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडून आले. विविध नातेसंबंधांबद्दल त्याला जाणीव झाली. स्वतःच्या आचार-विचारांबाबत तो सजग झाला. आपले वागणे, बोलणे आणि विचार करणे हे प्रचलित सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक आणि नैतिक मूल्यांना धरून आहे की नाही, हे माणसाला पूर्णपणे समजत असते.खरंतर, 'झोपलेल्याला जागे करणे सोपे असते; परंतु झोपल्याचे सोंग घेणाऱ्याला जागे करणे अवघड असते,' असे म्हटले जाते. त्याच पद्धतीने सार्वजनिक जीवनात अघळपघळपणे वागणारे लोक हे झोपेचे सोंग घेतलेल्या लोकांप्रमाणेच असतात. मुद्दाम स्वतःची दखलपात्रता वाढवण्यासाठी आणि स्वतःचे उपद्रवी मूल्य सिद्ध करून स्वार्थ साधण्यासाठी असे लोक काही वेळेस सार्वजनिक जीवनात वेडीवाकडी वर्तणे करताना दिसतात.

काही जण बहुसंख्यवादाचा आधार घेत गर्दीचा भाग होऊन वाईटाचे सोबती आणि पाठीराखे बनतात. काही जण आपली मनोवृत्ती बदलण्यास तयार नसतात. 'आपण जगतोय आणि वागतोय तेच योग्य आहे,' या भ्रमात ते जगत राहतात. धार्मिक बाबी या वैयक्तिक राहिल्या पाहिजेत, यावर आजपर्यंत सर्वांनी शिक्कामोर्तब केले आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. विविध धर्मांचे सण-उत्सव हे आता सार्वजनिक शांतता बिघडवण्यास कारणीभूत ठरत आहेत. त्याचबरोबर समाजमाध्यमे हीसुद्धा सार्वजनिक माध्यमे आहेत, याची काहींना जाणीव उरलेली नाही.

फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या सार्वजनिक समाजमाध्यमांतून व्यक्त होताना आपण फार मोठ्या जनसमुदायावर प्रभाव टाकत असतो, हे काहींच्या ध्यानात येत नाही. सार्वजनिक, आभासी आणि प्रत्यक्ष जीवनात आपले भान राखणे, तसेच स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे, ही प्रत्येकाच्या हातातील गोष्ट आहे.

ब एका लग्नकार्यास जाण्याचा योग आला होता. तेथे पिण्याच्या पाण्याची सार्वजनिक सोय होती. परंतु नळाच्या शेजारी पाणी पिण्यासाठी लागणारे ग्लास साखळीने बांधून ठेवले होते. मी त्या गर्दीत सहज बोलून गेलो की, ज्या दिवशी आपल्या देशात अशा पद्धतीने ग्लास साखळीने बांधून ठेवण्याची गरज पडणार नाही, त्यावेळेस आपला देश नक्कीच प्रगतीपथावर गेलेला असेल.तेव्हा तेथे उभा असलेला एक युवक हास्यविनोद करत म्हणाला, प्रगती साधून काय करायचे आहे? आहे त्यात आम्ही सुखी आहोत! त्याचे हे बोलणे एका प्रकारची स्थितप्रज्ञता दर्शवत होते. आपल्या देशातील सार्वजनिक जीवनाबद्दल लोकांची हीच भावना आहे, हे प्रतिनिधिक रूपात तो सांगून गेला.

रेल्वेच्या स्वच्छतागृहात लिहिलेली किळसवाणी वाक्ये वैयक्तिक जीवनातील बेछूटपणा लपून सार्वजनिक जीवनात व्यक्त करण्याची उर्मी प्रतिबिंबित करत असतात. काही लोकांचे असे बेछूटपणे वागणे सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था बिघडवत असते.म्हणून एक सच्चा नागरिक म्हणून स्वतःच्या सार्वजनिक जीवनासाठी काही आचारनियम आपण स्वतःहून तयार करून घेतले पाहिजेत.मी दुसऱ्याच्या जीविताचे रक्षण करीन.मी दुसऱ्याच्या आरोग्याची काळजी घेईन. मी दुसऱ्याला शारीरिक अथवा मानसिक इजा होऊ देणार नाही.माझ्या बोलण्यावर मी नियंत्रण ठेवीन.माझ्या मनावर आणि भावनांवर मी पूर्ण लक्ष देईन.माझ्या स्वातंत्र्याबरोबरच इतरांच्या स्वातंत्र्याचाही आदर राखीन.

कारण सार्वजनिक जीवनातील सभ्यता ही केवळ कायद्याच्या भीतीतून निर्माण होत नाही; ती आपल्या विवेकातून, जबाबदारीच्या जाणिवेतून आणि इतरांच्या हक्कांचा आदर करण्याच्या वृत्तीतून निर्माण होते. आपण प्रत्येकाने आपल्या वर्तनाची जबाबदारी स्वीकारली, तर सार्वजनिक जीवन अधिक शांततापूर्ण, सुसंस्कृत आणि मानवी बनू शकते.आपले स्वातंत्र्य जपताना इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करणे, हाच खऱ्या अर्थाने सभ्य आणि नैतिक सार्वजनिक जीवनाचा पाया आहे.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**मो.नं. ९९२२८८२५४१**

# सण नव्हे इव्हेंट

नुकताच झालेला दहीहंडीचा सण राज्यात मोठ्या उत्साहात साजरा झाला. मात्र उंचच उंच दहीहंडी फोडताना अनेक ठिकाणी दुर्घटना होऊन त्यात अनेक गोविंदा जखमी झाले. गुरुवार रात्री पर्यंत मुंबईतील जखमी झालेल्या गोविंदांची संख्या सव्वाशेच्या पुढे गेली.

यातील काही गोविंदांना रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले तर काही गोविंदा अजूनही रुग्णालयात उपचार घेत आहेत त्यातील काही गोविंदा जबर जखमी आहेत. अर्थात दहीहंडी फोडताना गोविंदा जबर जखमी होणे हे काही याच वर्षी घडले असे नाही दरवर्षी हेच चित्र पाहायला मिळते. पूर्वी या उंचच दहीहंडी फक्त पुणे, मुंबई, ठाणे या मोठ्या शहरातच पाहायला मिळत असे मात्र अलीकडे हे लोण ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण भागातही राजकीय नेते उंचच उंच दहीहंडी लावून हजारो रुपयांचे बक्षिसाचे आमिष दाखवून दहीहंडीचा इव्हेंट करुन राजकीय शक्तीप्रदर्शन करतात मात्र या शक्तीप्रदर्शनात अनेक गोविंदा जायबंदी होतात. राजकीय नेते गोविंदांचा विमा वगैरे शब्द वापरून तरुण गोविंदाना झुलवण्याचा प्रयत्न करतात पण अपघात झाल्यानंतर कायमस्वरूपी अपंगत्व आल्यावर मिळणारी विम्याची रक्कम म्हणजे आयुष्याचे सार नव्हे!

ऐन तारुण्यात जर कायमस्वरूपी अपंगत्व आले तर त्या तरुण गोविंदाची आणि त्याच्या कुटुंबाची काय अवस्था होईल याची कल्पनाही करवत नाही. ऐन तारुण्यात वृद्ध आई वडिलांवर अवलंबून उर्वरित जीवन कंठण्याची वेळ त्यांच्यावर येते. अशा कायम स्वरूपी अपंगत्व आलेल्या तरुण गोविंदांना राजकीय नेते वाऱ्यावर सोडतात कारण त्यांचे शक्तिप्रदर्शन संपलेले असते. अर्थात हे शक्तिप्रदर्शन केवळ दहीहंडी पुरतेच मर्यादित असते असे नाही तर तर सर्व सणांमध्ये असते. वास्तविक सण उत्सव हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. जगात सर्वाधिक सण भारतात साजरे केले जातात मुळातच भारत उत्सवप्रिय देश आहे मात्र अलीकडे हे सण उत्सवातील पावित्र्य नष्ट होत चालले आहे. ज्या उद्देशासाठी हे सण उत्सव साजरे केले जातात तो उद्देशच हरवला आहे आता हे सण उत्सव म्हणजे इव्हेंट बनले आहेत.

कोणताही सण घ्या तो सण न राहता इव्हेंट बनला आहे मग तो दिवाळी असो की गणेशोत्सव. दिवाळीमध्येही फटाक्यांचे प्रदूषण आणि आगीच्या घटना घडतातच दिवाळी हा दिव्यांच्या सण आहे मात्र अलीकडे तो फटाक्यांच्या सण बनला आहे त्यामुळे ध्वनीप्रदूषणासोबतच वायू प्रदूषणही होते मात्र मोठ्या आवाजाचे प्रदूषण करणारे फटाके उडवून दिवाळी साजरी करण्याकडेच अनेकांचा कल असतो. मागील काही वर्षात गणेशोत्सवाचे पावित्र्यही लोप पावले आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो उद्देशच आपण विसरलो आहोत.

गणेशोत्सवातील उंचच उंच मूर्तींची स्पर्धा, नवसाला पावणाऱ्या गणेश मंडळातील स्पर्धा यामुळे गणेशोत्सव सण आहे की स्पर्धा असा प्रश्न पडतो. गणेशोत्सव म्हणजे राजकीय नेत्यांना पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन करण्याचे हक्काचे व्यासपीठ वाटते. गणेश ही बुद्धीची देवता मानली जात असताना बुद्धी गुंडाळून त्याची खरी आराधना भक्ती करताच येत नाही. नवरात्रीमध्येही हीच परिस्थिती असते एकूणच आज सणांचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातील पावित्र्य नष्ट झाले असून आता सण उत्सव म्हणजे केवळ इव्हेंट बनले आहे. सण उत्सव म्हणजे राजकीय नेत्यांसाठी शक्तीप्रदर्शन करण्याचे व्यासपीठ बनले आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## गौरी गणपती



वाजत गाजत आले
गणराज सुखेविराजे
भाव भक्ती ऐश्वर्याने
८ गरीब भक्त बने राजे

जेष्ठाकनिष्ठागौरीच्या
आगमने दुंदुभी गाजे
दुग्धशर्कर केशरयोग
ऊत्साह आनंद साजे

विहंगम दृश्य पहाया
आवताण दिधलेविजे
ढोल ताशेही नैसर्गिक
लयबध्द सुरमयी गर्जे

स्नेहाळ प्रेम वर्षावात
मनमुराद सगळे भिजे
अवनीवर तारांगण हे
सुख स्वर्गात नसे दुजे

पक्वान्नांचा घमघमाट
अन्नपूर्णा साक्षात सजे
प्रसाद वाटता परिसरा
उदर तुडुंब भरले माझे

कितीद्याल सहस्र करे
उपकृतसंचितांचेओझे
पुण्य किरकोळ माझे
अस्मादिकझालो खुजे

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## पावसात थांबलेला क्षण!

पावसाच्या सरी, रस्त्याची वाट,
धुक्याची चादर, हिरवी पहाट.
प्रवासात थांबला एक निवांत क्षण,
हातात कणीस, चहाचा घोट गरम.

कणीसावर मीठ, लिंबाचा स्पर्श,
चहाच्या वाफेत मातीचा हर्ष.
टपटप थेंबांचा खिडकीवर ताल,
मनात उमटला पावसाचा सुरेल ताल.

ना घाई कुठली, ना पोहोचायची आस,
त्या क्षणापुरता पुरेसा सहवास.
रस्ता पुढे होता, प्रवास बाकी होता,
पण जीव त्या क्षणी पावसात भिजला होता.

काही क्षण असेच मनात उतरतात,
चहाच्या घोटांत आठवणी भरतात.
कणीस संपतं, पाऊसही थांबतो,
पण निवांत क्षण मनात तसाच राहतो

**कीर्तिराज आगलावे, पुणे**

# गणेशोत्सवातील निर्माल्य संकलनातून १८ हजार ६०० किलो निर्माल्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन...

**दि.१७, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, गणेशोत्सवादरम्यान संकलित होणाऱ्या निर्माल्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यात येत आहे. १५ सप्टेंबर २०२६ रोजी दीड दिवसाच्या कालावधीत २० हजार ७०३ गणेशमूर्तींचे विसर्जन झाले असून, सुमारे १८ हजार ६०० किलो निर्माल्य संकलित करण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत संकलित करण्यात आलेल्या निर्माल्याचे विकेंद्रीत पद्धतीने व्यवस्थापन करण्यात येत आहे. हिरानंदानी इस्टेट, ऋतू पार्क तसेच कौसा येथील मॅकॅनिकल बायो-कंपोस्टिंग प्रकल्पांमध्ये शास्त्रोक्त पद्धतीनुसार निर्माल्यावर प्रक्रिया केली जात आहे. संकलित निर्माल्यामध्ये साधारणपणे ३ टक्के प्लास्टिक पिशव्यांचे प्रमाण आढळून आले आहे. हे प्लास्टिक निर्माल्यापासून वेगळे करून त्याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावण्यात येत असून, त्याचे व्यवस्थापन चठऋ सेंटरमध्ये करण्यात येत आहे.



गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या निर्माल्याचे योग्य संकलन, वर्गीकरण आणि प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याच्या दृष्टीने महापालिकेने नियोजन केले आहे. या माध्यमातून निर्माल्य नदी, तलाव, खाडी अथवा इतर जलस्रोतांमध्ये जाण्यापासून रोखून जलप्रदूषणाला आळा घालण्यास मदत होत आहे. ठाणे महापालिकेच्या पर्यावरणपूरक व्यवस्थापनाला नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रबोधनकार ठाकरे जयंतीनिमित्त पनवेल महापालिकेत अभिवादन

**अक्षराज : जे. के.पोळ**

**दि.१७, पनवेल :** महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज गुरुवार दि.१७ सप्टेंबर रोजी केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रबोधनकार ठाकरे हे महाराष्ट्रातील प्रख्यात समाजसुधारक, पत्रकार, लेखक, वक्ते आणि समाजप्रबोधनकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या लेखणीच्या आणि प्रभावी वक्तृत्वाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, सामाजिक विषमता आणि कालबाह्य रूढी-



परंपरांविरोधात जनजागृती केली. त्यांच्या निर्भीड लेखनातून आणि परखड विचारांतून सामाजिक सुधारणेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचला. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक चळवळीच्या इतिहासात प्रबोधनकार ठाकरे यांचे कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते.

त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना समाजातील विषमता दूर करण्यासाठी तसेच विवेक, समता आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये जपण्यासाठी त्यांच्या विचारांचे स्मरण यावेळी करण्यात आले.यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक गणेश कडू, सुमित झुंजारराव, कुसूम म्हात्रे, तसेच परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# अक्षराज

## गौरी गणपती विशेष




अक्षराज मीडियाचे संपादक श्री.विनोद गोरे व सौ.प्राजक्ता चव्हाण गोरे यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा




गॉड्स काऊंटी सोसायटी, चऱ्होली खुर्द, आळंदी, पुणे येथे विराजमान गणपती बाप्पा




कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा भाजप चिटणीस रमेश मुंढे यांच्या निवासस्थानी स्मिता वाटवाणी व त्याचे सुपुत्र अर्जुन यांनी गणरायाचे दर्शन घेतले.




रविंद्र परब माथेरान यांच्या घरी पाच दिवसाचा गणपती स्वामी समर्थ व गणपती बाप्पाची सुंदर मूर्ती




गणेश मोकाशी (दहिसर मोकाशी पाडा ता .जि.ठाणे) यांच्या घरचा बाप्पा.




गजराज मित्र मंडळ, महाबळेश्वर जि. सातारा




प्रेमनाथ पाटील (शिळगांव, पोस्ट पडले, ता.जि.ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




सुनिल आलिमकर (शिळगांव, पो. पडले, ता. जि. ठाणे) याचा घरचा बाप्पा




साईनाथ भोईर (शिळगांव, पोस्ट पडले ता .जि. ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




संदीप पाटील (डायघर गाव, पोस्ट पडले ता .जि. ठाणे) यांचा घरचा गणपती बाप्पा




जिवन आलिमकर (खाडी गाव, पोस्ट पडले, ता.जी ठाणे) यांचा घरचा बाप्पा




प्रदीप साळुंखे (नेवाळीगांव, तालुका जिल्हा ठाणे, नवी मुंबई) यांच्या घरचा बाप्पा




आत्माराम पाटील (किरवली गाव, पोस्ट तलोजा, तालुका पनवेल जिल्हा रायगड) यांचा घरचा बाप्पा




माथेरानमध्ये प्राथमिक शाळेचे सुन्दर डेकोरेशन दिलीप शिंदे रेडिमनी बंगला यांच्या घरी साकारले आहे.




माथेरान येथील चंद्रकांत धनावडे यांच्या कडे आज गौरीचे आगमन झाले गौरी गणपतीचे सुंदर दृश्य सुंदर सजावट

## थोडक्यात बातम्या

### अंतुर्लीत बिबट्याचा धुमाकूळ! ३ शेळ्यांवर हल्ला नागरिकांमध्ये घबराट



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि. १७, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील अंतुर्ली येथील शिवारात दुपारी दोन वाजेच्या सुमारास बिबट्याने अचानक हल्ला करून तीन बकऱ्यांची शिकार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे अंतुर्ली परिसरातील शेतकरी आणि गुराख्यांमध्ये प्रचंड घबराटीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंतुर्ली येथील रहिवासी अभिमान आप्पा शिरसाट, सुरेश हरी भिल आणि अक्काबाई आसाराम भिल हे तिघे नेहमीप्रमाणे आज दुपारी आपल्या शेळ्या-बकऱ्या चरण्यासाठी अंतुली शिवारात घेऊन गेले होते. दुपारी २ वाजेच्या सुमारास झुडुपात उसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक बकऱ्यांच्या कळपावर हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्लूयात बिबट्याने तिघांच्या प्रत्येकी एक अशा एकूण तीन बकऱ्या ठार केल्या.

प्रत्यक्षदर्शींनी आरडाओरड केल्याने बिबट्याने तेथून जंगलाच्या दिशेने पळ काढला, मात्र या घटनेत पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतात कामाला जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वन विभागाने या घटनेचा तत्काळ पंचनामा करून बाधित पशुपालकांना योग्य ती आर्थिक भरपाई द्यावी आणि बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी शिवारात तत्काळ पिंजरा लावावा, अशी जोरदार मागणी अंतुर्ली ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### होळनांथे आर सी पटेल विद्यालयात हिंदी कथाकथन स्पर्धा संपन्न




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१७, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील होळनांथे येथील आर सी पटेल माध्यमिक विद्यालयात दिनांक १४ सप्टेंबर हिंदी दिवस व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय आमदार अमरीशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात हिंदी कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कथाकथन स्पर्धेमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला होता. कथाकथन स्पर्धा दोन गटात घेण्यात आली. कथाकथन स्पर्धेमध्ये दोन्ही गटातून एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यात लहान गटातून भूमिका जगदीश जाधव, ज्ञानेश्वरी गणेश पाटील, दिव्यांनी योगेंद्र गिरासे, तर मोठ्या गटातून राशी रवींद्र पाटील, चंचल शिवाजी नाईक, संजना गणेश नाईक या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.

कथाकथन स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक एस डी गाडीलोहार हे होते. कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय भाईसाहेब अमरीशभाई पटेल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा विद्यालयातर्फे देण्यात आल्या.कथाकथन स्पर्धा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाय आर ठाकरे यांनी केले, तर आभार एम जी पावरा यांनी मानले. स्पर्धेचे परीक्षण डी डी राजपूत व प्रतिभा सावळे यांनी केले. एस डी गाडीलोहार यांनी हिंदी भाषेचे महत्त्व विशद करताना देशाला एक सूत्र मध्ये बांधण्याचे काम हिंदी भाषा करते असे सांगितले. सी आर शिंपी यांनी देशाच्या भाषिक विकासामध्ये हिंदी चे स्थान याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक अश्विनी महाजन, एस के पावरा, टी ए पाटील, राहुल पवार, सागर वारुडे, जया धनगर, वृषाली कासार, जागृती जाधव, योगिता चौधरी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### पिंपळगाव गायके शिवारात अवैध रेती वाहतूक पकडली!

**ट्रॅक्टर-ट्रॉलीसह ६ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त; एकावर गुन्हा दाखल**




**अक्षराज : जफर शेख**

**दि.१७, बोरी (परभणी) :** स्थानिक गुन्हे शाखा, परभणीच्या पथकाने मंगळवारी पिंपळगाव गायके शिवारात कारवाई करत विनापरवाना रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर-ट्रॉलीसह एकूण ६ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपळगाव गायके शिवारातील दुधनगाव ते पिंपळगाव गायके जाणाऱ्या पांदण रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. यावेळी अमोल अशोक सोनपसारे (वय ३०, रा. दुधनगाव, ता. जिंतूर) हा विनापरवाना बेकायदेशीररीत्या रेती उपसा करून स्वतःच्या फायद्यासाठी विक्री करण्याच्या उद्देशाने रेतीची वाहतूक करताना आढळून आला.

कारवाईदरम्यान पोलिसांनी लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर, ट्रॉली आणि त्यामध्ये असलेली रेती, असा एकूण ६,०६,००० रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस शिपाई उमेश गोविंदराव चव्हाण (वय ३९) यांच्या फिर्यादीवरून बोरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४८(७) व ४८(८) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुना शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सवंडकर, हेड कॉन्स्टेबल मुकेश बुधवंत, हेड कॉन्स्टेबल विलास सातपुते, हेड कॉन्स्टेबल पांडुरंग तुपसुंदर आणि पोलीस शिपाई उमेश चव्हाण यांच्या पथकाने केली.

# जमीन संपादनाला दशक उलटले, पुनर्वसन अद्याप प्रतीक्षेत

## उच्च न्यायालयाने वेकोली व केंद्र सरकारला धरले धारेवर

### राजुरा तालुक्यातील सुब्बई- चिंचोली भागातील शेकडो शेतकरी न्यायाच्या प्रतिक्षेत

**अक्षराज : चंद्रकांत भोयर**

**दि. १७, राजुरा (चंद्रपूर) :** वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडकडून (वेकोली) कोळसा खाण प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्यासह पुनर्वसन व पुनर्स्थापनेच्या धोरणानुसार रोजगार व आर्थिक मोबदल्याची मागणी करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १६ सप्टेंबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण आदेश दिला. न्यायमूर्ती भारती डांगरे व न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने WCL च्या संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत आतापर्यंत कोणती पावले उचलली, याचे स्पष्टीकरण मागितले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील चिंचोली-सुब्बई परिसरातील सुमारे १८२.८३ हेक्टर (सुमारे ४५२ एकर) शेतजमीन २०१५ ला सुब्बई-चिंचोली रिकास्ट कोळसा प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली. या भूसंपादनामुळे सुमारे २०५ हुन अधिक प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबे प्रभावित झाली आहेत.

प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरणानुसार रोजगार व मोबदला मिळणे अपेक्षित असताना, गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचा हा प्रश्न प्रलंबित आहे. शेकडो शेतकरी कुटुंबांना त्यांच्या हक्काचा रोजगार व आर्थिक मोबदल्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. दीपक चटप यांनी उच्च न्यायालयात मांडले. केंद्र सरकारकडून ॲड. कार्तिक शुकूल यांनी बाजू मांडली.

याचिकाकर्त्यांच्या रोजगार व मोबदल्याच्या मागणीवर २ सप्टेंबर २०२१ रोजी WCL कडून नकारात्मक भूमिका घेण्यात आली होती. संबंधित क्षेत्र म्हणून ओळखले गेले असले तरी कोळशाचा खरेदीदार उपलब्ध नसल्याने प्रकल्प अधिसूचना रद्द करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे वेकोलीने नमूद केले होते. याचिकाकर्त्यांनी न्यायालयासमोर मांडले की, त्यांच्या जमिनी संपादित झाल्यानंतर पुनर्वसन व रोजगाराचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. एकदा अधिसूचना काढून जमीन अधिग्रहण प्रक्रिया कोल बेरिंग कायद्याच्या कलम ११ प्रमाणे पूर्ण झाल्यानंतर अधिसूचना रद्द करण्याची कोणतीही तरतूद कायद्यात नसल्याने वेकोलीने केंद्र सरकारला पाठवलेला प्रस्ताव चुकीचा ठरतो असे देखील ॲड. दीपक चटप यांनी उच्च न्यायालयात मांडले.

या सुनावणीदरम्यान न्यायालयाने २०२१ पासून २०२६ पर्यंतच्या पाच वर्षांच्या कालावधीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला. प्रकरणात वेकोली प्रशासनाकडून होणाऱ्या दिरंगाईबाबत ठोस उत्तर द्यावे असे न्यायालयाने नमूद केले.

याचिकाकर्त्यांसह इतर प्रकल्पग्रस्तांच्या मागणीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आणि पुनर्वसन व पुनर्स्थापनेसाठी कोणती पावले उचलण्यात आली, याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकरणाची पुढील सुनावणी ६ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार आहे.

# पालशेत-जोईलवाडीत पाणीपुरवठा पूर्ववत; ग्रामस्थांकडून प्रशासनाचे आभार

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि. १७, पालशेत (गुहागर) :** गणेशोत्सवाच्या तोंडावर पालशेत-निवोशी ग्रामपंचायत हद्दीतील जोईलवाडीमध्ये निर्माण झालेला पाणीप्रश्न अखेर मार्गी लागला असून, ग्रामस्थांचा पाणीपुरवठा आता सुरळीत सुरू झाला आहे.



दि. १६ सप्टेंबर रोजी प्रसिद्धी माध्यमांनी सदर समस्येवर लक्ष वेधले होते. त्याची ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ दखल घेतली.

पाणीपुरवठा करणाऱ्या विद्युत लाईन मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने गेली आठ दिवस पाणीपुरवठा खंडित झाला होता. हा बिघाड दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाला मोठी कसरत करावी लागली.

अखेर ग्रामपंचायत प्रशासनाच्या मेहनतीला आणि जोईलवाडी ग्रामस्थ मंडळाच्या पाठपुराव्याला यश आले असून, नळाद्वारे पाणीपुरवठा पूर्ववत झाला आहे.

पाणीपुरवठा सुरळीत झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, तातडीने दखल घेऊन समस्या सोडविल्याबद्दल ग्रामपंचायत प्रशासनाचे तसेच समस्या प्रकाशात आणल्याबद्दल प्रसिद्धी माध्यमांचे आभार मानले आहेत.

ऐन सणासुदीच्या काळात पाणीपुरवठा पूर्ववत झाल्याने जोईलवाडीतील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून, गणेशोत्सवाचा आनंद आता द्विगुणित झाला आहे.

# ग्रामपंचायत म्हाते खुर्दचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा अभिनव आदर्श

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१७, मेढा (सातारा) :** गणेशोत्सव म्हटला की भक्ती, उत्साह आणि आनंदाची पर्वणी; मात्र या उत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा अभिनव उपक्रम ग्रामपंचायत म्हाते खुर्दने हाती घेतला आहे. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम केवळ आवाहनापुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरला असून, पर्यावरण संवर्धनाचा एक वेगळा आदर्श निर्माण होत आहे.



मुख्यमंत्री पंचायतराज अभियानात उल्लेखनीय कामगिरी करत तालुकास्तरावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ग्रामपंचायत म्हाते खुर्दने यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरण संवर्धनाला विशेष प्राधान्य दिले आहे.

ग्रामपंचायतीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत मंगला अशोक पवार यांनी पंचधातूची गणेशमूर्ती प्रतिष्ठापित केली असून पंचधातूची गौराईही बसविणार आहेत. तर कुंदा प्रकाश दळवी यांनी स्वतःच्या हाताने मातीची गणेशमूर्ती तयार करून तिला नैसर्गिक रंगांचा वापर केला आहे. त्यामुळे भक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश घराघरांत पोहोचत आहे.

**विसर्जन न करता मूर्ती जतन करण्याचा निर्णय...**

गावात एकच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ असून नेहरू युवा गणेशोत्सव मंडळाने यंदा आपल्या गणेशमूर्तीचे विसर्जन न करता ती जतन करून पुढील वर्षी त्याच मूर्तीची पुनः प्रतिष्ठापना करण्याचा निर्णय घेतला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी घेतलेला हा निर्णय विशेष चर्चेचा ठरत असून त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**निर्माल्यापासून तयार होणार कंपोस्ट खत...**

घरगुती गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी ग्रामपंचायतीने कृत्रिम विसर्जन कुंडाची व्यवस्था केली आहे. तसेच गणेशोत्सवातील निर्माल्य नदी, ओढे अथवा जलस्रोतांमध्ये न टाकता त्यासाठी स्वतंत्र निर्माल्य संकलन व्यवस्था करण्यात आली आहे. संकलित निर्माल्याचे कंपोस्ट खतामध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. त्यामुळे धार्मिक श्रद्धेसोबत स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणाचा संदेशही दिला जात आहे.

**डॉल्बीमुक्त उत्सव आणि प्लास्टिकमुक्तीचा संकल्प**

म्हाते खुर्दमध्ये यंदाचा गणेशोत्सव डॉल्बीमुक्त साजरा करण्याचा उपक्रमही राबविण्यात येत आहे. त्याचबरोबर प्लास्टिक संकलनासाठी घरोघरी डस्टबिनची व्यवस्था करण्यात आली आहे. उत्सवाच्या माध्यमातून स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा ग्रामपंचायतीचा प्रयत्न आहे.

**जिल्हास्तरावरून उपक्रमाची दखल**

ग्रामपंचायतीच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाची जिल्हास्तरावरूनही दखल घेण्यात आली आहे. स्वच्छता विभागाचे जिल्हा तज्ज्ञ अजय राऊत यांनी म्हाते खुर्द येथे भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली आणि ग्रामपंचायत व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

यावेळी विस्ताराधिकारी गोविंद माने, शिक्षण विस्ताराधिकारी अरविंद दळवी, सरपंच राजाराम दळवी, बी.आर.सी. संतोष जाधव, ग्रामपंचायत अधिकारी सरस्वती दळवी, नेहरू युवा मंडळाचे अध्यक्ष योगेश दळवी, उपाध्यक्ष अभिषेक दळवी, नवयुग विकास नागरी सहकारी पतपेढीचे माजी अध्यक्ष विलास दळवी, सविता दळवी, दीपाली दळवी, कांचन दळवी, मंगला पवार, ग्रामपंचायत कर्मचारी आनंदा दळवी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

गणेशोत्सवातून भक्ती, पर्यावरण संवर्धनातून जबाबदारी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून शाश्वत विकास म्हाते खुर्दने यंदाच्या गणेशोत्सवातून हा त्रिसूत्री संदेश दिला आहे. त्यामुळे उत्सव साजरा करताना पर्यावरणाचीही काळजी घेता येते, हे या गावाने कृतीतून दाखवून दिले आहे.

# सिद्धार्थ महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा

**अक्षराज : विठ्ठल निकाळजे**

**दि.१७, छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, बलिदान आणि संघर्षाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने रामाई प्रतिष्ठान संचलित सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय, सिद्धार्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, सिद्धार्थ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स, सानिका कॉलेज ऑफ बी-डिझाईन व सानिका कॉलेज ऑफ नर्सिंग, मिटमिटा, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रांगणात १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या त्यागाला अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. मनोहर वानखेडे यांनी आपल्या मनोगतात मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि त्यामागील संघर्ष विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले. स्वातंत्र्य हे सहज प्राप्त झालेले नसून त्यासाठी अनेकांनी आपले जीवन, सुख आणि सुरक्षितता पणाला लावली, याची जाणीव विद्यार्थ्यांनी ठेवावी, असे त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यसैनिकांच्या विचारांचा आणि मूल्यांचा आदर करून जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या प्रगतीत योगदान देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाचा इतिहास आणि त्यातील शहीद व स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक बांधिलकी, इतिहासाची जाणीव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सांगता स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली अर्पण करून करण्यात आली.

मराठवाड्याच्या मातीला, शहीदांच्या बलिदानाला मानाचा मुजरा या भावनेतून आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# न्हावा-शिवा बेसमध्ये कंत्राटी कामगारांचे बेमुदत काम बंद आंदोलन

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१७, उरण (रायगड) :** न्हावा-शिवा बेस येथील ONGC प्रशासनाच्या कामगार कपात धोरणाविरोधात आणि कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ कंत्राटी कामगारांनी बुधवार, १६ सप्टेंबरपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. ग्रामपंचायत न्हावा आणि ग्राम सुधारक मंडळ न्हावा यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले असून, कामगारांच्या मागण्यांवर प्रशासनाने सकारात्मक विचार न केल्यास आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.




न्हावा-शिवा बेस येथे कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांवर गेल्या पाच महिन्यांपासून प्रशासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे. कामगार कपात थांबविण्यासाठी तसेच प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटीही घेण्यात आल्या. मात्र, एवढा पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. कामगारांच्या मुख्य प्रश्नांवर निर्णय घेण्याऐवजी प्रशासनाकडून टाळाटाळ केली जात असल्याने कामगारांमध्ये नाराजी वाढत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. दरम्यान, गेल्या २० ते २२ वर्षांपासून न्हावा-शिवा बेस येथे कार्यरत असलेल्या १७ कंत्राटी कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता ऑगस्ट महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून कामावरून कमी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक वर्षे सेवा बजावलेल्या कामगारांना अचानक कामावरून कमी केल्यामुळे त्यांच्या कुटुंबांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. रोजगाराचे साधन हिरावले गेल्याने या कामगारांवर उपासमारीची वेळ आली असून, कामगारांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कामावरून कमी करण्यात आलेल्या १७ कामगारांना तातडीने पुन्हा सेवेत रुजू करून घ्यावे आणि त्यांना वेतन संरक्षण द्यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. तसेच भविष्यात कोणत्याही कंत्राटी कामगाराची कपात केली जाणार नाही, अशी लेखी हमी ONGC व्यवस्थापनाने द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला असून, प्रशासनाने याबाबत तातडीने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

याशिवाय, समय ॲपद्वारे सक्तीने हजेरी नोंदविण्याच्या पद्धतीवरही कामगारांनी आक्षेप घेतला आहे. बहुतांश कामगारांना डिजिटल प्रणाली हाताळताना अडचणी येत असल्याने समय ॲपद्वारे सक्तीची हजेरी नोंदविण्याची पद्धत तातडीने बंद करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांच्या अडचणींचा विचार करून हजेरी प्रणालीबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, असेही आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

कामगार कपात थांबविणे, सेवेतून कमी केलेल्या १७ कामगारांना पुन्हा कामावर घेणे, वेतन संरक्षण देणे आणि भविष्यात कामगार कपात केली जाणार नाही याची लेखी हमी देणे, या प्रमुख मागण्यांसह कंत्राटी कामगारांनी आंदोलन सुरू केले आहे. ग्रामपंचायत न्हावा आणि ग्राम सुधारक मंडळ न्हावा यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाद्वारे प्रशासनाचे लक्ष प्रलंबित प्रश्नांकडे वेधण्यात येत आहे. कामगारांच्या मागण्यांवर ONGC प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन प्रश्न मार्गी लावावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांबाबत ठोस निर्णय न झाल्यास बेमुदत काम बंद आंदोलन सुरूच ठेवण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरपंचांचीच नियुक्ती करा

## सरपंच परिषदेच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल



**प्रशासक काळात देयके काढण्याचा धडाका**

मुदत संपण्यास एक दिवस बाकी असताना प्रशासक म्हणून अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. आता प्रशासकाच्या काळात देयके काढण्याचा धडाका सुरू करण्यात आला आहे. बीडीओ, प्रशासक आणि ग्रामसेवक यांनी संगनमताने सोमवारपर्यंत एक रुपयाचे जरी देयक काढले,तरी संबंधित ग्रामसेवक व प्रशासक यांच्यावर सरपंच परिषदेच्या वतीने गुन्हे दाखल करण्यात येईल. न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत कोणतीही देयके काढली जाऊ नयेत.

**– संजय रोकडे,**
**याचिकाकर्ते वडगाव सावताळचे सरपंच**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** ग्राम पंचायतींवर प्रशासक म्हणून सरपंच यांचीच पुन्हा नियुक्ती करावी, या मागणीसाठी सरपंच परिषदेच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

न्यायालयाने परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचा आदेश दिला आहे. राज्य सरकारने यावर निर्णय घेण्यासाठी २२ सप्टेंबरपर्यंतची मुदत मागिल्याची माहिती सरपंच परिषदेचे राज्याध्यक्ष जितेंद्र भोसले व याचिकाकर्ते अरुण दळवी यांनी आज शासकीय विश्राम गृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस टाकळी ढोकेश्वरचे सरपंच बाळासाहेब खिलारी, याचिकाकर्ते वडगाव सावताळचे सरपंच संजय रोकडे, कर्जुले हार्याचे सरपंच सुनिता तुकाराम मुळे, भाऊसाहेब भराटे, एकनाथ भोसले, दादाभाऊ रोकडे यांच्यासह अनेक सरपंच व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निवडणुका का नाहीत?**

राज्यात मुदत संपलेल्या १७ हजार ग्रामपंचायतीं निवडणुकांच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र राज्य सरकार निवडणुका घेत नाही. त्या का घेतल्या जात नाहीत, असा प्रश्न सरपंच परिषदेने उपस्थित केला आहे. राज्य सरकारने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दि. २२ पर्यंत मुदत मागितली आहे. मात्र याबरोबरच उच्च न्यायालयाच्या मुंबई व औरंगाबाद खंडपीठातही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. मात्र त्या अद्याप सुनावणीस आलेल्या नाहीत, असेही जितेंद्र भोसले व अरुण दळवी यांनी सांगितले.

यापूर्वी १४ हजार ग्रामपंचायती निवडणुकीच्या प्रतीक्षेत असताना राज्य सरकारने विस्तार अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती. त्यास सरपंच परिषदेने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर सरपंच व तत्कालीन ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आली. ही मुदत संपल्यानंतर आता पुन्हा विस्तार अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. आता आणखी ३ हजार ग्रामपंचायतींची भर पडली आहे.

**गावगाडा विस्कळीत !**

इतक्या मोठ्या संख्येने प्रशासक म्हणून राज्य सरकारकडे मनुष्यबळ उपलब्ध नाही, या अधिकाऱ्यांना गावगाडा कसा हाकायचा याची माहिती नाही, त्यामुळे अनेक गावांमध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. प्रशासक म्हणून एका अधिकाऱ्याकडे अनेक गावांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अधिकारी गावांना कधी भेटी देत नाहित, आता सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्ती द्यावी, म्हणजे गावगाडा सुरळीत चालेल अशी मागणी भोसले व दळवी यांनी केली.

# पिंपळगाव काजळेच्या वेदांत देव्हडेची क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१७, जिंतूर :** पिंपळगाव काजळे येथील वेदांत विनोद देव्हडे याने सातत्यपूर्ण मेहनत, आक्रमक फलंदाजी आणि उत्कृष्ट क्रिकेट कौशल्याच्या जोरावर क्रिकेट क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या ओडिशातील कटक डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनकडून खेळणाऱ्या वेदांतने यंदाच्या हंगामात दमदार फलंदाजी करत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये स्थान मिळविले असून, २०२६-२७ च्या बीसीसीआय अंतर्गत ण-१९ विन्नू मंकड चषकासाठी त्याची निवड झाली आहे.

वेदांतच्या क्रिकेट प्रवासाला जवळपास बारा वर्षे पूर्ण झाली आहेत. जिंतूर येथील जवाहर विद्यालयातून त्याच्या क्रिकेट कारकिर्दीची पायाभरणी झाली. संस्थापक अध्यक्ष खंडेरावजी वटाणे आणि प्राचार्य बळीरामजी वटाणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने शालेय जीवनात क्रिकेटचे प्राथमिक धडे घेतले. तसेच जिंतूरचे प्रशिक्षक शेख शाहरुख यांच्या मार्गदर्शनाचाही त्याच्या सुरुवातीच्या प्रवासात महत्त्वाचा वाटा आहे. अवघ्या १२व्या वर्षी उत्कृष्ट खेळ करत त्याने जवाहर विद्यालयाच्या संघाला राज्यस्तरावर पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.वेदांतला क्रिकेटच्या मैदानावर घडविण्यात त्याचे वडील विनोद प्रल्हाद देव्हडे यांचाही मोठा वाटा आहे. क्रिकेटच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी स्वतः मुलाला प्रशिक्षण दिले. विकेटकीपिंगची निवड करण्यापासून क्रिकेटच्या मूलभूत कौशल्यांपर्यंत त्यांनी वेदांतला सातत्याने मार्गदर्शन केले.

**मुलाच्या स्वप्नासाठी व्यवसाय सोडून पुण्याची वाट**

वेदांतचे वडील विनोद प्रल्हाद देव्हडे हे आयुर्वेदाचार्य असून आई मीरा विनोद देव्हडे या नोंदणीकृत फार्मासिस्ट व औषध निर्मात्या आहेत. मुलाला क्रिकेटमध्ये दर्जेदार प्रशिक्षण आणि चांगल्या संधी मिळाव्यात, यासाठी त्यांनी जिंतूर येथे तब्बल १७-१८ वर्षांपासून सुरू असलेला व्यवसाय सोडून पुणे गाठले. मुलाच्या स्वप्नासाठी आई-वडिलांनी घेतलेला हा निर्णय आणि केलेला त्याग वेदांतच्या यशामागील महत्त्वाचा आधार ठरला.पुढील व्यावसायिक प्रशिक्षणासाठी वेदांत पुण्यात दाखल झाला. पुण्यातील पीवायसी हिंदू जिमखाना येथे प्रशिक्षक पराग शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने क्रिकेटचे व्यावसायिक



बारकावे आत्मसात केले. तसेच शकील शेख सेंच्युरी क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक आणि अमोल मुरकुडे, नागपूर-तिरोडा क्रिकेट अकॅडमी यांचेही त्याला महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.

**ओडिशात फलंदाजीचा ठसा !**

सध्या ओडिशातील कटक डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनकडून खेळताना वेदांतला सुमंता नायक, दिलीप सामल, विघ्नेश मोहंती, पृथ्वी आणि प्रशांत शेट्टी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. विविध प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे त्याच्या खेळात सातत्याने सुधारणा होत गेली.यंदाच्या डिस्ट्रिक्ट क्रिकेट स्पर्धेत वेदांतने आपल्या फलंदाजीचा विशेष ठसा उमटविला. एका वन-डे सामन्यात त्याने अवघ्या १४१ चेंडूंत २२६ धावांची शानदार खेळी केली. तर दुसऱ्या सामन्यात १२० चेंडूंत नाबाद १९० धावांची आक्रमक खेळी साकारली. या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे यंदाच्या हंगामात तो डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनमधील सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये आघाडीवर राहिला.पिंपळगाव काजळेच्या मातीतून सुरू झालेला वेदांतचा क्रिकेट प्रवास जिंतूर, पुणे असा टप्प्याटप्प्याने पुढे जात आज ओडिशाच्या क्रिकेट मैदानापर्यंत पोहोचला आहे. बारा वर्षांची कठोर मेहनत, अनेक प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई-वडिलांचा भक्कम पाठिंबा या जोरावर त्याने बीसीसीआयच्या ण-१९ विन्नू मंकड चषकाच्या व्यासपीठापर्यंत मजल मारली आहे.

ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य संधी, दर्जेदार प्रशिक्षण आणि कुटुंबाचा भक्कम पाठिंबा मिळाल्यास ती राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठापर्यंत पोहोचू शकते, याचे वेदांत देव्हडे हे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. त्याच्या या यशाबद्दल जिंतूर व परभणी जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी स्पर्धेतील त्याच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात बातम्या

### कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या वतीने विश्वकर्मा जयंती उत्साहात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, खापरखेडा :** दरवर्षी प्रमाणे कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन खापरखेडाच्या वतीने प्रकाश नगर वसाहतीतील राम मंदिरात विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

हिंदू पौराणिक कथेनुसार भगवान विश्वकर्मा यांना वास्तुकलेचे शिल्पकार मानले जाते. प्रामुख्याने कारागीर, अभियंता, वास्तुविशारद, मेकॅनिक आणि कारखाना कामगारांसह विविध क्षेत्रात भगवान विश्वकर्मा जयंती साजरी केली जाते.

१७ सप्टेंबर गुरूवारला कॉन्टॅक्टर असोसिएशन खापरखेडाच्यावतीने राम मंदिर येथे भगवान विश्वकर्माच्या प्रतिमेची मंत्रोच्चारात महेश अढाऊ सपत्नीक यांच्या हस्ते पूजा अर्चना करण्यात आली. यानंतर महाप्रसाद वितरण करण्यात आले. यावेळी शेकडो, कंत्राटी कामगार, वीज केंद्र अधिकारी, कंत्राटदार व ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

याप्रसंगी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (संचलन) विलास मोटघरे, खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे, उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, किशोर सूर्यवंशी, सचिन डेगवेकर, अधीक्षक अभियंता कमलेश मुनेश्वर, विलासकुमार उके, आनंद सातबद्रे, लेखा सहाय्यक महाव्यवस्थापक नंदकिशोर सातकर, वरिष्ठ सुरक्षा व्यवस्थापक नवीनकुमार सत्तीवाले, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, सरपंच मीनाक्षी तागडे, कॉन्टॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड, महासचिव दिवाकर घेर, मोहन जैन, शांताराम, गावंडे,शामराव सरोदे, पुरुषोत्तम चांदेकर, महेश अढाऊ, रमेश लोणारे, अनिल भोयर, कुणाल भोस्कर, विनोद बरडे, अहफाज अहमद, हेमराजसिह परिहार, मनीष धोटे,मनोज डेविड, रामचंद्र जोगे, राहुल गेडाम, यू.डी. गेडाम, अमर जैन, कबीर हुसेन, देवाजी कुबडे, बालू परिहार, अशोक वासनिक, राजेश गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, केशव पानतावणे,दिलीप ढगे, राजेश खंडारे, दिनेश लोडेकर,विनोद गोडबोले, अशोक शर्मा, राजू गभने,रवी सिंघम, राजेश खंडारे, संतोष पाटील, पप्पी वाडीभस्मे, नितीन मोहिते, आकाश परमार यांच्यासह कॉन्टॅक्टर असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संखेने उपस्थित होते.

### महाराष्ट्र विद्यालयाचे कुस्तीगीर विभागीय स्तरावर

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१७, नागपूर :** सुरेश भट सभागृह नागपूर येथे संपन्न झालेल्या शालेय नागपूर जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयातील शालेय कुस्तीगीरांनी उल्लेखनीय कामगिरी करून आपापल्या वयोगटामध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक प्राप्त केले.

**१४ वर्ष वयोगटात**

३८ किलो खालील विष्णू केळवदे प्रथम,

**१९ वर्ष वयोगटात**

६१ किलो खालील प्रांजल बर्वे प्रथम,

७४ किलो खालील कुशल आवळे प्रथम,

यांनी आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक पटकावून भंडारा येथे होणाऱ्या शालेय विभागीय कुस्ती स्पर्धेकरिता आपली निवड निश्चित केली असुन खेळाडूंना क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे यांचे मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार ,सचिव सुहासताई केदार, कोषाध्यक्ष संध्या ठाकरे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक जितेंद्र ठाकरे ,पर्यवेक्षक नरेंद्र माहूरतळे, क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, धर्मेंद्र सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वर्ग यांनी विजयी कुस्तीगीरांचे अभिनंदन केले.

### रांजणगाव जि.परिषद शाळेत शालेय साहित्य वाटप



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** रांजणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कै. काशिनाथ शंकरराव गाढवे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंचे मोफत वाटप करण्यात आले. गाढवे कुटुंबाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांना शालेय जीवनात मदतीचा हात मिळावा आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे या हेतूने गाढवे परिवाराकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हे साहित्य हाती पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

याप्रसंगी गाढवे कुटुंबातील श्रीमती लताबाई गाढवे, विक्रम गाढवे, कुलदीप गाढवे, भाग्यश्री गाढवे आणि मोहिनी गाढवे, सुरेशजी येणारे प्रामुख्याने उपस्थित होते. सामाजिक सेवेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या आणि शिक्षणाप्रती आदर भाव ठेवून नेहमीच मदतीचा हात पुढे करणाऱ्या गाढवे परिवाराचे शाळेच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना असणे, उपशिक्षक पठारे संदीप आणि उपशिक्षिका रूपाली गंधाडे यांनी गाढवे कुटुंबाचे आभार मानले. या प्रसंगी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.